# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## कर आकारणी विभाग

| | |
|---|---|
| **आदेशाचे स्वरुप** | मालमत्ता कर वसुली बाबत. |
| **आदेश क्रमांक** | १८५ दिनांक ०९/१२/२०१९. |
| **विषय** | संपूर्ण मिळकतकराची एक रकमी भरणा करणाऱ्या थकबाकीदारांना अभय योजने अंतर्गत मनपा करांवर आकारणेत आलेली अटकावणी अधिपत्र (नोटीस फी व वॉरंट फी) तसेच शास्ती व इतर फी. इ. रक्कम माफ/सवलत देणे बाबत. |
| **संदर्भ** | मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २७७ दि. ०७/१२/२०१९. |
| **अंमलबजावणी कालावधी** | दिनांक १६ डिसेंबर २०१९ ते १० फेब्रुवारी २०२० |
| **कोणाच्या माहितीसाठी** | कर आकारणी विभाग/लेखापरिक्षण विभाग/ वित्त व लेखा विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/ विभागीय अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ वसुली सहाय्यक अधिक्षक/ सर्व वसुली लिपीक/ संगणक कार्यप्रणाली देखभाल दुरुस्ती, येस बँक (सॅनटेक सिस्टीम्स, नाशिक). |

नाशिक महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागा अंतर्गत ६ विभागीय कार्यालयामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शहरातील इमारती व जमिनींवर कर आकारणी करुन मालमत्ता कराची वसुली करणेत येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ (१) मध्ये विहित कालावधीमध्ये पात्र असलेल्या व्यक्तीने मालमत्ता कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील, येणे प्रमाणे तरतुद आहे. त्यानुसार नाशिक महानगरपालिकेने सन २०१३-२०१४ पासून सदर तरतूदीनुसार मनपा कर, शास्ती लागु करणेत आली आहे.

तसेच ज्या मिळकतधारक / भोगवटादार यांना मालमत्ता कर भरणेकामी वारंवार सुचना देऊनही व अंतिम सुचनापत्र बजावणेत येऊनही त्यांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशा मिळकतधारक/भोगवटादारांन विरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ मधील नियम ४२ ते ४६ अन्वये अटकावणी अधिपत्र बजावून नियम ५० अन्वये त्यांना वॉरंट फी व नोटीस फी तसेच सरकारी वॉरंट फी व नोटीस फी आकारण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ अन्वये शास्ती फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल - आयुक्तांस, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खाली फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल, अशी तरतूद आहे.

नियम ४१ मध्ये नमुद केलेनुसार अदत्त रकमेवर शास्ती लागु असल्याने, दिवसेंनदिवस शास्तीचे प्रमाण वाढत असल्याने वसुली इष्टांकावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ अन्वये,

थकबाकीदार मिळकतधारक यांचे मनपा करांवरील शास्ती तसेच अटकावणी अधिपत्र मनपा वॉरंट फी व मनपा नोटीस फी मध्ये थकबाकीसह मिळकत कराची संपुर्ण रक्कम एक रकमी भरणा करणाऱ्या मिळकतधारक/ भोगवटादारांकरिता सवलत / माफी देणेकामी खालील प्रमाणे अभय योजना कार्यन्वीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | थकबाकीसह संपूर्ण मिळकतकराची रक्कम भरणेकामी कालावधी | मनपा कर शास्ती, वॉरंट फी व नोटीस फी देणेची माफी / सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दि. १६ डिसेंबर २०१९ ते ३१ जानेवारी २०२० अखेर | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपा करांवरील शास्ती, वॉरंट फी व नोटीस फी रक्कमेचे ७५ टक्के |
| २ | दि. ०१ फेब्रुवारी २०२० ते १० फेब्रुवारी २०२० अखेर | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपा करांवरील शास्ती, वॉरंट फी व नोटीस फी रक्कमेचे ५० टक्के |

यापुर्वी कर भरणाऱ्या मिळकतधारक / भोगवटादार यांना पुर्वलक्षी प्रभावाने सदर योजनेचा लाभ देण्यात येऊ नये.

विभागीय अधिकारी यांनी थकबाकीदार मिळकतधारक/भोगवटादार यांना अभय योजने बाबत जास्ती जास्त जनजागृती करावी. तसेच सदर कालावधीत दुसरा शनिवार, चौथा शनिवार, सर्व रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवशी सर्व वसुली कार्यालये, उप कार्यालये व भरणा केंद्र सुरु रहातील याची दक्षता घेण्यात यावी.

सदर योजना सुरु होणेपुर्वी तसेच योजनेच्या कालावधीत संबंधीत नियुक्त वसुली कर्मचारी हे प्रत्येक थकबाकीदाराच्या भेटी घेऊन सदर योजनेचे प्रबोधन करतील व त्यांना थकबाकी भरणेकामी प्रोत्साहीत करणे इ. संपुर्ण जबाबदारी संबंधीत विभागाच्या विभागीय अधिकारी यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

दि. १६/१२/२०१९ ते दि. १०/०२/२०२० या कालावधीत अभय योजनेची सवलत देणेकामी उक्त नमुद प्रमाणे संगणक कार्यप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरी

**आयुक्त**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**